महाराष्ट्र शासन

COLLECTORATE,WASHIM
COMPLATION NO
18 FEB 2020
COLLR RDC SUPDT

क्रमांक: जनग २०२०/१२९/ प्र.क्र.२२/का.५.
सामान्य प्रशासन विभाग,
नविन प्रशासन भवन, ६ वा मजला,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १७ फेब्रुवारी, २०२०.

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी/
सर्व महानगरपालिका आयुक्त.

विषय :- तांत्रिक सहायक व शिपाई यांची जनगणनेच्या कामासाठी कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत.

संदर्भ :- जनगणना आयुक्त् , भारत सरकार गृह मंत्रालय,नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक NO ९/५९/२०१९/CD (CEN),दिनांक १० जानेवारी, २०२० रोजीचे पत्र

आदरणीय महोदय,

जनगणना आयुक्त नवी दिल्ली यांनी त्यांच्या दिनांक १० जानेवारी, २०२० च्या पत्रानध्ये जनगणना कामाकरीता तांत्रिक सहायक व शिपाई यांची नियुक्ती करणेबाबत नमूद केले आहे. सदर पदे दिनांक १/२/२०२० ते ३१/०७/२०२१ या १८ महिन्याच्या कालावधी करीता उपलब्ध राहतील. तांत्रिक सहायकांचे प्रशिक्षण २४ फेब्रुवारी,२०२० पासून सुरु होणार आहे.

२. तरी त्यापैकी तांत्रिक सहाय्यक व शिपाई यांची नियुक्ती कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांच्या www.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करुन जिल्हा व तालुका स्तरावर नियुक्ती करावयाची आहे. तथापि, सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवा देखील या कामासाठी घेता येतील. सदर संकेतस्थळाबाबत काही अडचणी असल्यास सहायक संचालक, जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांचेशी संपर्क करावा, ही विनंती

आपली नम्र,

(सही)

( उ. पो. सावंत)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

Scanned by CamScanner
Scanned by CamScanner
Scanned by CamScanner

**जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम**
ISO 9001:2008 मानांकित कार्यालय
दुरध्वनी 07252-233653फॅक्स 07252-232858
E-Mail: rdc_washim@rediffmail.com Web site http://washim.nic.in

क.कक्ष/जनगणना/कावी-230/2020 दिनांक 22/02/2020

**जनगणना 2021 करीता 18 महिण्याचे कालावधी करीता कंत्राटी पदभरती घेणे बाबत सुचना**

कळवीण्यात येते की,जनगणना 2021 करीता तांत्रीक सहायक,बहूकार्य कर्मचारी MTS Staff या पदाकरीता पत्र.क जनगणना/ कावी-106/2020 दिनांक 15.2.2020 नुसार जाहीरात प्रसिदध् केलेली आहे. परंतु सामाण्य् प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्.जनग-2020/129/प्र.क्.22/का-5 दिनांक 17 फेबूवारी 2020 मधिल निर्देशानुसार सदर जाहीरात www.mahaswayam.in पोर्टलवर प्रसिदध करुन त्याव्दारे जनगणना 2021 करीता तांत्रीक सहायक व बहूकार्य कर्मचारी MTS Staff या पदाकरीता पात्र उमेदवाराची निवड करणे बाबत निर्देश आहेत. तरी प्रस्तुत प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळवीण्यात येते की, कौशल्य विकास व उदयोजकता विभाग यांचे मार्फत पात्र व पुरेसे उमेदवार मिळाल्यास या कार्यालयाने दि.15.2.2020 रोजी प्रसिध्द केलेल्या जाहीरातीनुसार पात्र उमेदवार मिळण्याकरीता मुलाखात घेण्याची आवश्यकता भासणार नाही.

कौशल्य विकास व उदयोजकता विभाग यांचे मार्फत पात्र उमेदवार मिळाले नाहीत तर ज्या उमेदवारांनी जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम येथे समक्ष अथवा पोस्टाने अर्ज दाखल केलेले आहे त्यांच्या मधुन मुलाखात घेण्याची आवश्यकता भासल्यास त्या बाबत जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम, http://washim.nic.in वर स्वतंत्रपणे सुचना देण्यात येतील. तसेच या कार्यालयाने दि.15.2.2020 रोजी प्रसिध्द केलेल्या जाहीरात नुसार दिनांक 25.02.2020 रोजीच्या वरील पदाकरीता च्या मुलाखती रद्द करण्यात येत आहेत.

(सहपत्र-सामाण्य् प्रशासन विभाग पत्र.दि.17.2.2020)

22/02/202

for जिल्हा जनगणना अधिकारी तथा
निवासी उपजिल्हाधिकारी वाशिम

Scanned by CamScanner
Scanned by CamScanner
Scanned by CamScanner